## चारोळ्या – भाग ३१

गत जन्मीचे
होते देणे
त्याच साठी
झाले येणे.

मागणे न आता उरले
तृप्त झाले मन
नको मला काही देवा
तूच माझे धन.

केले कुणास्तव, ते किती
हे कधी मोजू नये
घेतले कुणाकडून किती
ते, कधीच विसरू नये.

मोह नाही, लोभ नाही
राग नाही, रोष नाही
व्हायचे जे, झाले ते
त्याचा कुणा, दोष नाही.




– पद्माकर चित्रे
('मी न माझा' या चारोळीसंग्रहातून)